भारती विदयापीठ पोलीस ठाणे,पुणे.

दिनांक –१८/०४/२०१९

- प्रेसनोट –

## खुनाचा प्रयत्न करुन पसार झालेल्या आरोपींना अटक

---

भारती विदयापीठ पोलीस ठाणे गु.र.न.१९०/२०१९ भा.द.वि.कलम.३०७, १४२, १४३, १४४, १४६, १४७, १४८, १४९ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) सह १३५, ऑर्म्स ॲक्ट कलम ४(२५) प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयातील फिर्यादी अक्षय अनंता शिंदे, वय २३ वर्षे, रा. घर नं.१, स.न.५/६, टेल्को सोसायटी, शिवशक्ती कॉलनी, जांभुळवाडी रोड, पुणे याला दि.०२/०३/२०१९ रोजी सायंकाळी ०८.२६ वा सुमारास गणेश पवार व त्याचे साथीदार यांनी पुर्वीच्या भांडणाच्या कारणावरुन डोळयात मिरची पावडर टाकुन कोयत्याने वार करुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला होता. सदर मारहाणीत फिर्यादी यास एकुण ११० टाके असणाऱ्या गंभीर जखमा झाल्या होत्या. आरोपी हे गुन्हा केल्यापासुन पसार झाले होते. सदर गुन्हयातील निष्पन्न आरोपी गणेश पवार, कृष्णा लोखंडे, अजय घाडगे, संदिप धुमाळ यांचा शोध घेणेबाबत मा. वरिष्ठ पोलीस निरिक्षक सो श्री विष्णु पवार यांनी आदेश केलेप्रमाणे त्याचा दिंनाक.१७/०४/२०१९ रोजी शोध घेत असताना सदर पाहिजे आरोपी हे स्वामी नारायण मंदिराच्या डोगरावर जंगलात मित्राला भेटण्यासाठी येणार आहे. अशी गुप्त माहिती पोलीस कर्मचारी सर्फराज देशमुख व राहुल ताबे यांना त्याच्या खास बातमीदारामार्फत मिळाली होती. मिळालेल्या बातमीप्रमाणे तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी असे स्वामी नारायण मंदिराच्या जवळ खाजगी वाहनाने जावुन सापळा रचुन थांबलो. त्यावेळी गणेश पवार, कृष्णा लोखंडे, अजय घाडगे, संदिप धुमाळ हे दुपारी १५.१० वा. सुमारास पुणे बेगलोर हायवे वरुन स्वामी नारायण मंदिराच्या शेजारील डोंगरावर संशयीत रित्या जाताना दिसले. त्यांना पकडण्याकामी गेलो असता ते पळुन जावु लागले तेव्हा त्याचा पाठलाग करुन पकडुन त्यांना त्यांची पुर्ण नाव पत्ता विचारता त्यांनी त्याची नावे १) गणेश कविश पवार, वय १९ वर्षे, रा. शनिनगर, साई मंदिराच्या जवळ, आंबेगाव खुाा पुणे २) कृष्णा बबन लोखंडे, वय १९ वर्षे, रा.सदर ३) अजय भागवत घाडगे, वय १९ वर्षे, रा.सदर ४) संदिप सिध्देश्वर धुमाळ, वय १९ वर्षे, रा.सदर असे सांगितले. त्यावेळी त्यांना ताब्यात घेवुन पोलीस ठाणे येथे घेवुन येवुन त्याच्याकडे अधिक तपास करता गणेश पवार याने सांगितले की, माझी व शुभम जांभळे यांची काही दिवसाच्या पुर्वी भांडणे झाली होती. त्यावेळी अक्षय शिंदे याने माझ्या बरोबर वाद घातला होता व आईला ही शिवीगाळ केली होती. त्याचा राग मनात धरुन मी माझ्या साथीदारासह त्याला कोयत्याने मारहाण करुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला होता, अशी कबुली दिली आहे. सदर आरोपी यांना अटक करण्यात आली असुन त्याच्याकडे गुन्हयात इतर कोणाकोणाचा सहभाग होता याबाबत सहा. पोलीस निरीक्षक केसरकर हे अधिक तपास करत आहेत.

सदर कामगिरी उत्तर प्रादेशिक विभाग श्री रविंद्र सेनगावकर सो, परिमंडळ २ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री बच्चनसिंग सो, सहाय्यक पोलीस आयुक्त व्हि.प्र.नांदेडकर सो यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विष्णु पवार, पोलीस निरीक्षक(गुन्हे) विष्णु ताम्हाणे, तसेच तपास पथकाचे सहा. पोलीस निरिक्षक प्रमोद नलवडे, पोलीस कर्मचारी कृष्णा बढे, सर्फराज देशमुख, राहुल तांबे, गणेश चिचंकर, अभिजीत जाधव, कुंदन शिंदे, सचिन पवार, मंहेश मंडलीक, अभिजीत रत्नपारखी, नितीन धोत्रे यांनी केलेली आहे.

पोलीस निरीक्षक (गुन्हे)
भारती विदयापीठ पोलीस ठाणे,पुणे.